# अभंग - ज्ञानेश्वरी

## अध्याय बारावा

सद्गुरु माउली । होसी तूं उदार । तुझा जयजयकार । असो नित्य ।।१।।
नित्य आनंदाचा । करिसी वर्षाव । शुद्ध [१] स्वयमेव । प्रसिद्ध तूं ।।२।।
वेढोनि घेतलें । विषयांच्या [२] व्याळें । तेणें ताटकळे । जीव जरी ।।३।।
तरी लाभतां च । तुझी कृपादृष्टि । हरोनियां जाती । विष-बाधा ।।४।।
कृपा-रसाचिया । उसळोनि लाटा । तयाचा तो येतां । महापूर ।।५।।
कैसा भव-ताप । कोणातें पोळील । दु:ख तें जाळील । कैसें कोणा ।।६।।
तुझी कृपा होतां । लाभतो अखंड । योगसुखानंद । भक्तांलागीं ।।७।।
भक्तां सोऽहं-सिद्धि । देवोनि उघड । पुरविसी लाड । तयांचे तूं ।।८।।
मोदें * मूलाधारीं । * कुंडलिनीचिया । मांडीवरी तयां । खेळविसी ।।९।।
मग झोंके देसी । प्रेमें घालोनियां । हृदयाकाशाचिया । पाळण्यांत ।।१०।।
मन-पवनाचीं । खेळणीं करोन । टाकिसी हरोन । जीव-भाव ।।११।।
आणि तयांलागीं । [३] स्वरूपानंदाचीं । बाळ लेणीं तूं चि । लेवविसी ।।१२।।
तेविं * सत्रावीचें । देसी स्तनपान । * अनाहत-गान । गावोनियां ।।१३।।
समाधीचा बोध । करोनियां चांग । [४] बुझावोनि मग । झोंपविसी ।।१४।।
ऐशापरी होसी । साधकासी माता । प्रभो कृपावंता । गुरुराया ।।१५।।
तुझ्या सुमंगल । चरणाचे ठायीं । रम्य पीक येई । * साहित्याचें ।।१६।।
म्हणोनि मी राहें । सद्गुरु-माउली । तुझ्या छायेखालीं । निरंतर ।।१७।।
जयालागीं देते । [५] कारुण्यें आश्रय । दृष्टि कृपामय । माते तुझी ।।१८।।

---

* परिशिष्ट पहा.   १ स्वत:   २ सर्पानें.   ३ आत्मानंदाची.   ४ समजावून.   ५ दयेनें.

सर्वविद्यारूप । सृष्टीचा सर्वथा । होय तो विधाता । एकाएकीं ।।१९।।
सर्व हि ऐश्वर्यें । संपन्न तूं माता । होसी *कल्प-लता । भक्तांलागीं ।।२०।।
तरी मज आतां । देईं [1] आज्ञापन । ग्रंथ-निरूपण । करावया ।।२१।।
नव हि रसांचे । भरोनि सागर । *साहित्यालंकार । [2] यथोचित ।।२२।।
भव्य भावार्थाचे । प्रचंड पर्वत । निपजवीं येथ । ग्रंथामाजीं ।।२३।।
साहित्य-सुवर्ण–। खाणी प्रकटोत । सुपीक भूमींत । मराठीच्या ।।२४।।
तेंवि नित्यानित्य–। विवेकाच्या वेली । लावीं तूं माउली । ठायींठायीं ।।२५।।
संवाद-फळांचीं । निधानें च साचीं । ऐसीं प्रमेयांचीं । उपवनें ।।२६।।
करावीं तयार । तुवां निरंतर । विस्तीर्ण गंभीर । घनदाट ।।२७।।
वितंडवादाचे । आडमार्ग मोडीं । दरीखोरीं तोडीं । [3] पाखांडाचीं ।।२८।।
नाना कुतर्कांचीं । श्वापदें तीं दुष्ट । अंबे टाकीं नष्ट । करोनियां ।।२९।।
श्रीहरीचे गुण । वर्णावया नित्य । देईं तूं सामर्थ्य । मजलागीं ।।३०।।
श्रवणाचें सुख । हें चि राज्य-पद । तेथें श्रोतृ-वृंद । बैसवीं तूं ।।३१।।
देश-भाषेच्या ह्या । [4] पट्टणामाझारीं । सुकाळ तूं करीं । अध्यात्माचा ।।३२।।
आत्म-सुखाची च । जगें देवघेव । करावी सदैव । ऐसें होवो ।।३३।।
घालिसील जरी । तूं चि निरंतर । कृपेची पाखर । मजवरी ।।३४।।
तरी दयाळे हें । निर्मीन सकळ । न लागतां वेळ । निरूपणीं ।।३५।।
भाव-भक्ति-पूर्ण । नम्र विनवणी । ऐसी येतां कानीं । स्वभावें ती ।।३६।।
सद्‌गुरु-माउली । होवोनि प्रसन्न । कृपावलोकन । करोनियां ।।३७।।
म्हणे ज्ञानदेवा । नको बोलूं फार । गीतार्थ सत्वर । सांगें आतां ।।३८।।
श्रीगुरूची आज्ञा । हा महा-प्रसाद । लाभतां आनंद । झाला जीवा ।।३९।।
निरूपीन येथ । गीता- [5] मथितार्थ । देवोनियां चित्त । ऐका आतां ।।४०।।

अर्जुन उवाच–
एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ।।१।।

---

१ आदेश; हुकूम. २ योग्य असे. ३ नास्तिकपणाचीं. ४ नगरांत. ५ रहस्य; तत्त्वार्थ.

तरी वीरांमाजी । सर्वश्रेष्ठ देखा । [१] जय-ध्वज जो का । [१] सोमवंशीं ॥४१॥
पंडुराजाचा तो । पुत्र धनंजय । मग बोले काय । कृष्णालागीं ॥४२॥
म्हणे प्रभो मज । होवोनि प्रसन्न । दाविलें आपण । विश्व-रूप ॥४३॥
परी तें अत्यंत । विराट अद्भुत । म्हणोनियां चित्त । भ्यालें माझें ॥४४॥
आणि सगुणाची । जीवासी संवय । म्हणोनि आश्रय । घेतला हा ॥४५॥
तंव विश्वरूपीं । बुडी दिल्यावीण । सगुणीं रंगोन । नको जाऊं ॥४६॥
ऐसें सांगोनियां । सगुणापासोन । निवारिलें मन । माझें देवें ॥४७॥
तरी एक चि तूं । सगुण-निर्गुण । ओळखिली खूण । निःसंदेह ॥४८॥
सगुण साकार । भक्तियोगें प्राप्त । निर्गुण अव्यक्त । योग-पंथें ॥४९॥
भक्ति आणि योग । दोन हि हे मार्ग । करविती चांग । तुझी प्राप्ति ॥५०॥
तुझ्या व्यक्ताव्यक्त । स्वरूपाच्या दारीं । रिघावें श्रीहरी । ह्या चि मार्गीं ॥५१॥
परी शत-भार । सुवर्णामधून । वेगळें काढून । वालभरी ॥५२॥
दोहोंचा हि कस । पाहतां साचार । पडे ना अंतर । तयांमाजीं ॥५३॥
तैसें तुझें रूप । अव्यक्त निर्गुण । साकार सगुण । सारिखें च ॥५४॥
दिव्य अमृताच्या । महार्णवीं साचें । जें का सामर्थ्याचें । थोरपण ॥५५॥
तें चि लाभे तैसें । घेतां एक चूळ । त्या चि लाटेंतील । अमृताच्या ॥५६॥
व्यक्ताव्यक्त दोन्ही । एकरूप साच । प्रत्यय ऐसा च । असे माझा ॥५७॥
परी योगेश्वरा । प्रभो [६] जगजेठी । तुज ह्या चि साठीं । पुसतसें ॥५८॥
कीं जो तुवां देवा । मागें क्षणभर । केला अंगीकार । व्यापकाचा ॥५९॥
तें तुझें व्यापक । साच कीं कौतुक । कळावें हें एक । असे जैसें ॥६०॥
तरी ज्यांचीं कर्में । तुझ्या चि प्रीत्यर्थ । जयांलागीं श्रेष्ठ । तूं चि एक ॥६१॥
जयांनीं भक्तीसी । घातले विकोन । आपुले संपूर्ण । मनोधर्म ॥६२॥
ऐसे जे श्रीहरी । तुज सर्वां परी । बांधोनि अंतरीं । उपासिती ॥६३॥
आणि वस्तु जी का । ॐ कारा [२] पैलाड । वर्णावया जड । [३] वैखरीसी ॥६४॥
असे जी अतुल । [४] अक्षर अव्यक्त । मर्यादारहित । [५] अनिर्देश्य ॥६५॥

---

१ सोमवंशाची विजयपताका. २ पलीकडे. ३ वाचेला. ४ अविनाशी. ५ दाखवितां न येणारी.

ती च ती आपण । जाणोनि जे कोणी । उपासिती ज्ञानी । सोऽहंभावें ।।६६।।
ऐसे निज-ज्ञानी । ना तरी जे कोणी । राहिले होवोनि । भक्त तुझे ।।६७।।
तयां दोहोंतून । कोणालागीं पूर्ण । साच योगज्ञान । झालें सांगा ।।६८।।
भक्त किरीटीचे । ऐकोनि हे बोल । तोषला गोपाळ । [१] जगद्‌बंधु ।।६९।।
म्हणे काय कैसें । केव्हां विचारावें । भलें हें आघवें । जाणसी तूं ।।७०।।

श्रीभगवानुवाच–

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ।।२।।

प्रवेशतां सूर्य । [२] अस्ताचलाकांठीं । जाती तयापाठीं । [३] रश्मी जैसे ।।७१।।
किंवा वर्षाकाळीं । चढूं वाढूं लागे । भरोनियां वेगें । नदी जैसी ।।७२।।
चढती वाढती । तैसी श्रद्धा साची । माझिया भक्तांची । नित्यनवी ।।७३।।
झाली एकरूप । भागीरथी गंगा । सागराच्या अंगा । जडोनियां ।।७४।।
तरी मागील तो । ओघ अनिवार । राहे निरंतर । घोघावत ।।७५।।
तैसा भक्तांचिया । प्रेमा येई भर । जरी निरंतर । मद्रूप ते ।।७६।।
सर्वदा सकळ । इंद्रियांसहित । माझ्या ठायीं चित्त । ठेवोनियां ।।७७।।
उपासिता मातें । ऐसे रात्रंदिन । आत्म-समर्पण । करोनि जे ।।७८।।
तयां भक्तांलागीं । थोर योगयुक्त । मानितों निभ्रांत । धनंजया ।।७९।।

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।
सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ।।३।।
संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ।।४।।

आणि दुजे ते हि । जे का योगी थोर । सोऽहंभावावर । [४] आरूढोनि ।।८०।।
आकळिती ब्रह्म । अविनाशी पूर्ण । अनादि निर्गुण । निराकार ।।८१।।
मनाचें हि नख । शिवे चि ना जेथें । होय जें बुद्धीतें । [५] अगोचर ।।८२।।
तेथें इंद्रियांचा । काय लागे पाड । ऐसें जें का गूढ । ध्यानासी हि ।।८३।।

---

१ जगाचा हितकर्ता. २ मावळतीच्या कडेला. ३ किरण. ४ चढून. ५ अगम्य; न दिसणारे.

**जें ना एके ठायीं । सांपडे कधीं हि । सामावलें नाहीं । नाम-रूपीं ॥८४॥**
**सर्वपणें नित्य । असे सर्वांठायीं । चिंतन हि होई । कष्टी जेथें ॥८५॥**
**होय ना उत्पन्न । पावे ना विनाश । आहे-नाहीं [1] भाष । सरे जेथें ॥८६॥**
**म्हणोनि जें नाना । साधनीं साधे ना । चळे ना ढळे ना । संपे ना जें ॥८७॥**
**ऐसें सुनिर्मळ । पर-ब्रह्म भलें । ज्यांनीं आकळिलें । योग-बळें ॥८८॥**
**विषयांची सेना । टाकिली जाळोनि । पेटवोनि अग्नि । वैराग्याचा ॥८९॥**
**सर्वथा पोळलीं । इंद्रियें आपुलीं । ज्यांनीं आवरिलीं । धैर्य-बळें ॥९०॥**
**मग संयमाच्या । पाशें वळवून । ठेविलीं कोंडून । अंतरांत ॥९१॥**
**लावोनि आसन–। मुद्रा बळकट । गुद-द्वारीं नीट । धनंजया ॥९२॥**
**मूळ-बंधाचा तो । रचोनि बुरूज । झुंजावया सज्ज । झाले जे का ॥९३॥**
**ज्यांनीं आशा-पाश । टाकिले तोडून । कडे ढोंसळून । अधैर्याचे ॥९४॥**
**आणि नष्ट केला । सत्वर साचार । समूळ अंधार । निद्रारूप ॥९५॥**
**सप्त हि ते धातु । टाकिले जाळून । ज्यांनीं पेटवून । वज्राग्नीतें ॥९६॥**
**प्राणायामरूपी । [2] यंत्राचें पूजन । केलें समर्पून । [3] व्याधि-शीर्षें ॥९७॥**
**मूलाधार-चक्रीं । कुंडलिनी शक्ति–। ज्योत उभी होती । तेवती जी ॥९८॥**
**तिच्या प्रकाशांत । मस्तकापर्यंत । मार्ग आक्रमीत । निघाले जे ॥९९॥**
**नव-द्वारें पूर्ण । घेतलीं लावून । खीळ बसवून । संयमाची ॥१००॥**
*** ब्रह्मरंध्र-द्वार । उघडोनि मग । खुला केला मार्ग । * सुषुम्नेचा ॥१०१॥**
**प्राण-शक्तिरूपी । [4] चामुंडेच्या पुढें । संकल्पाचे मेंढे । मारोनियां ॥१०२॥**
**मनोमहिषाचें । मुंडकें तोडोन । तें चि समर्पण । केलें तिज ॥१०३॥**
*** इडा-पिंगलांची । करोनि मिळणी । सोडवोनि ध्वनि । अनाहत ॥१०४॥**
**मग समाधीचें । जें का चंद्रामृत । घेतलें त्वरित । जिंकोनि तें ॥१०५॥**
**जणूं तो कोरीव । [5] दादर विराजे । मध्य-विवर जें । सुषुम्नेचें ॥१०६॥**
**तेणें मार्गें मग । चढोनियां वर । गांठिलें शिखर । * ब्रह्मरंध्र ॥१०७॥**
*** अर्धमात्रा * मध्य–। संधीचा [5] सोपान । तो हि ओलांडून । गहन जो ॥१०८॥**

---

* परिशिष्ट पहा. १ बोलणें. २ तोफेचें. ३ रोगांचीं डोकीं. ४ चामुंडा-भवानी-देवीच्या. ५ जिना.

[१] मूर्धन्य आकाश । मारोनि काखेस । पावले ऐक्यास । ब्रह्म-पदीं ॥१०९॥
सर्वत्र सारिखी । ठेवोनियां बुद्धि । जे का सोऽहं-सिद्धि । गिळावया ॥११०॥
निज-बळें घेती । करोनि स्वाधीन । नि:सीम गहन । योग-दुर्ग ॥१११॥
करोनियां ऐसें । आत्मसमर्पण । होती जे का लीन । *महा-शून्यीं ॥११२॥
ते हि योग-ज्ञानी । योग-बळें साच । पावती मातें च । धनंजया ॥११३॥
एऱ्हवीं अधिक । योग-बळें कांहीं । मिळे ऐसें नाहीं । योगियांसी ॥११४॥
परी तयांलागीं । सायास आगळे । अधिक तें मिळे । हें चि एक ! ॥११५॥

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दु:खं देहवद्भिरवाप्यते ॥५॥

प्राणिमात्राचें जें । [२] परमैकहित । आधाररहित । निराकार ॥११६॥
तया [३] सद्वस्तूचा । पावावया ठाव । बांधिती जे हांव । भक्तीविण ॥११७॥
पदें *महेन्द्रादि । तयां नागविती । गांठोनि एकान्तीं । मार्गामाजीं ॥११८॥
ऋद्धि-सिद्धि-द्वन्द्वें । होवोनि प्रकट । आडविती वाट । योगियांची ॥११९॥
काम-क्रोधावेग । होती अनावर । तयांसी अपार । पीडा देती ॥१२०॥
झुंजवावें लागे । [४] शून्यासवें अंग । दुष्कर हा योग । पंडु-सुता ॥१२१॥
भागवावी भूक । भुकेतें गिळून । द्यावें तृषा-पान । तृषेलागीं ॥१२२॥
किंवा हात वांवा । घालोनि संतत । बैसावें मापीत । वायूलागीं ॥१२३॥
जेथें जागेपण । ही च निद्रा होय । विहार इंद्रिय–। निरोधाचा ॥१२४॥
वृक्ष-वेलींसंगें । करावे संवाद । मानोनि [५] सुहृद् । तयांलागीं ॥१२५॥
पांघरोनि ऊन । नेसोनियां [६] शीत । रहावें घरांत । पर्जन्याच्या ॥१२६॥
जन्मोजन्मीं तो चि । प्राप्त व्हावा पति । म्हणोनियां सती । *सती जाय ॥१२७॥
परी पतिविण । नित्य सती जावें । तैसें चि जाणावें । दुर्घट हें ! ॥१२८॥
किंवा जैसा कोणी । अर्पी निज-प्राण । कराया रक्षण । स्व-कुळाचें ॥१२९॥
येथें तैसें कांहीं । जरी नसे काज । तरी नित्य झुंज । काळासंगें ॥१३०॥
ऐसें मृत्युहून । साधन हें तीक्ष्ण । धनंजया जाण । कष्टदायी ॥१३१॥

---

१ मस्तकांतील. २ आत्यंतिक कल्याण. ३ ब्रह्माचा. ४ आकाशाबरोबर. ५ स्नेही. ६ थंडी.

घोर [१] दाहकारी । तप्त काळकूट । तयाचा का घोट । घेववेल ।।१३२।।
फाटल्यावांचून । राहील का तोंड । पर्वत प्रचंड । गिळूं जातां ।।१३३।।
म्हणोनि जे कोणी । योग-मार्गें जाती । तयां कष्ट होती । अनिवार ।।१३४।।
पाहें [२] बोथऱ्यासी । लोखंडाचे चणे । भाग पडे खाणें । जिये वेळीं ।।१३५।।
तिये वेळीं तेणें । काय भरे पोट । नव्हे का प्राणान्त । तयाचा तो ? ।।१३६।।
काय बाहु-बळें । सिंधु तरवेल । पायीं चालवेल । अंतराळीं ।।१३७।।
रणधुमाळींत । शिरोनि साचार । शरीरातें वार । न लागतां ।।१३८।।
सूर्य-मंडळासी । जाईल भेदून । ऐसा असे कोण । बळवंत ।।१३९।।
ना तरी दुर्बळ । पांगळा अपंग । धांवेल का सांग । वायूसंगें ।।१४०।।
निराकार ब्रह्म–। स्वरूपाचे ठायीं । तैसी गति नाहीं । देहवंता ।।१४१।।
ऐसें असोनी हि । जरी धैर्य-बळें । गांठाया निघाले । महा-शून्य ।।१४२।।
तरी सर्वथा ते । पात्र होती क्लेशा । ऐकें गुडाकेशा । पंडु-सुता ।।१४३।।
म्हणोनि जे कोणी । जाती भक्ति-पंथें । नाहीं च तयांतें । ऐसे कष्ट ।।१४४।।

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परा: ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ।।६।।

आपुल्या वांट्यास । स्व-वर्णानुसार । कर्में जीं साचार । आलीं येथें ।।१४५।।
तीं तीं पुरेपूर । आचरती वीरा । कर्मेन्द्रियद्वारा । आनंदानें ।।१४६।।
[३] निषेधिलें शास्त्रीं । तें तें नाचरिती । कर्म तें करिती । [४] विहित जें ।।१४७।।
परी मनोभावें । मातें समर्पून । टाकिती जाळून । कर्म-फळें ।।१४८।।
होतां माझ्याठायीं । कर्मांचा संन्यास । बाधे ना तयांस । कर्म-बंध ।।१४९।।
काया-वाचा-मनें । सर्व हि व्यापार । करिती साचार । माझ्यासाठीं ।।१५०।।
ऐसे माझ्या ठायीं । गढोनि जे गेले । उपासिती भले । निरंतर ।।१५१।।
आणि ध्यानमिषें । जयांचें हृदय । मातें घर होय । रहावया ।।१५२।।
ज्यांचें भक्ति-प्रेम । पार्था सर्वथैव । करी देवघेव । माझ्याशीं च ।।१५३।।
भोग आणि मोक्ष । बापुडे लेखून । तयां डावलून । दिलें ज्यांनीं ।।१५४।।

---

१ आग आग करणारें. २ दांत नसलेल्याला. ३ करूं नये म्हणून सांगितलें. ४ योग्य.

अनन्य होवोन । देह मन-प्राण । समर्पिलीं पूर्ण । ऐसीं मज ॥१५५॥
तयांचें मी सर्व । चालवितों पाहीं । पडूं देत नाहीं । कांहीं न्यून ॥१५६॥

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥७॥

किंबहुना पार्था । जैसी बाळावरी । माता प्रेम करी । जीवेंभावें ॥१५७॥
तैसे माझे भक्त । कैसे हि असोत । मज ते अत्यंत । आवडती ॥१५८॥
करीं सर्व काळ । तयांचा सांभाळ । दूर कळिकाळ । घालवोनि ॥१५९॥
नाहीं तरी पार्था । माझिया भक्तांसी । चिंता ती कायसी । संसाराची ॥१६०॥
राजाचिया कांते–। लागीं धनंजया । काय मागावया । लागे भीक ॥१६१॥
तैसे भक्त माझें । [1] प्रेम-पात्र साचें । लाजें ना तयांचें । करायासी ॥१६२॥
जन्ममृत्यूचिया । लाटांमाजीं पाहीं । गटंगळ्या खाई । जग सारें ॥१६३॥
देखोनि हें दृश्य । चित्तामाजीं भला । विचार हा आला । पंडु-सुता ॥१६४॥
ऐसा भव-सिंधु । जरी [2] क्षुब्ध होय । सांग कोणा [3] भय । [3] नुपजेल ॥१६५॥
तेथें भोळेभाळे । माझे भक्तजन । जातील भिवोन । ह्या चि लागीं ॥१६६॥
तयांचिया गांवा । आलों मी धांवोन । साकार सगुण । होवोनियां ॥१६७॥
सहस्र-नामांच्या । बनवोनि नौका । त्यांत भक्तां एकां । बैसवोनि ॥१६८॥
भवार्णवांतून । करावया पार । मी तों [4] कर्णधार । झालों पार्था ॥१६९॥
जे का कुटुंबादि । परिवारें युक्त । तयां * तरांड्यांत । बैसविलें ॥१७०॥
आणि एकटे जे । तयां अनायासें । ध्यानाचिया कांसे । लाविलें मीं ॥१७१॥
कोणा प्रेम-पेटी । बांधोनियां पोटीं । आणिलें मीं तटीं । सायुज्याच्या ॥१७२॥
असो भक्त कोणी । [5] चतुष्पाद प्राणी । तयाचा देखोनि । भक्तिभाव ॥१७३॥
वैकुंठाचें राज्य । पावावया भलें । सामर्थ्य मीं दिलें । तयालागीं ॥१७४॥
ऐसी भक्तांचिया । उद्धाराची चिंता । लागली सर्वथा । मजलागीं ॥१७५॥
आपुलिया छंदीं । गुंतविलें भक्तीं । मज चित्त-वृत्ति । समर्पोनि ॥१७६॥
म्हणोनियां पार्था । भक्ति-पंथें जावें । ध्यानीं हें ठेवावें । भक्तराजा ॥१७७॥

---

१ लाडके. २ खवळलेला. ३ भीति वाटणार नाही. ४ सुकाणूं धरणारा; नावाडी. ५ चार पायांचा.

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥८॥

अखंडित माझ्या । स्वरूपाच्या ठायीं । होवोनियां राहीं । [१] मिरासी तूं ॥१७८॥
मन आणि बुद्धि । प्रेमभावें दोन्ही । राहिलीं रिघोनि । मजमाजीं ॥१७९॥
तरी तुजलागीं । सुनिश्चयें पार्था । होईल सर्वथा । माझी प्राप्ति ॥१८०॥
मन बुद्धि दोन्ही । राहतां माझ्यांत । मी तूं ऐसें द्वैत । उरे कोठें ? ॥१८१॥
मालवतां दीप । जैसें तेज लोपे । प्रकाश हारपे । अस्तकाळीं ॥१८२॥
किंवा देहांतून । निघे जैसा प्राण । धांवती मागून । इंद्रियें हि ॥१८३॥
तैसीं मनोबुद्धि । जातील हीं जेथें । संगें येई तेथें । अहंकार ॥१८४॥
म्हणोनियां माझ्या । स्वरूपाच्या ठायीं । ठेवोनियां देईं । मन बुद्धि ॥१८५॥
एवढें होतां च । धनंजया साच । सर्वव्यापी मी च । होसील तूं ॥१८६॥
बोलणें हें माझें । नाहीं अप्रमाण । वाहतसें आण । आपुली मी ॥१८७॥

अथ चित्तं समाधातुं न शन्कोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥९॥

[२] नातरी हें चित्त । मनबुद्धीसवें । पूर्णपणें द्यावें । माझ्या हातीं ॥१८८॥
तुज सर्वकाळ । घडे ना हें जरी । तरी ऐसें करीं । पंडु-सुता ॥१८९॥
क्षण एक तरी । देत जाईं चित्त । आठां प्रहरांत । थोडें थोडें ॥१९०॥
मग माझ्या ठायीं । राहतां जडून । सुखाचा जो क्षण । लाभे तेथें ॥१९१॥
त्या त्या क्षणीं पार्था । तेवढी [३] अरुचि । [३] उपजेल साची । विषयांत ॥१९२॥
संपोनियां [४] वर्षा । शरत्काल रिगे । मग नदी लागे । ओहोटाया ॥१९३॥
तैसें वेगें चित्त । काढेल तेथून । प्रपंचीं गुंतून । राहिलें जें ॥१९४॥
किंवा शशिबिंब । पूर्णिमेपासून । [५] दिसंदीस क्षीण । होय जैसें ॥१९५॥
मग अंवसेस । हारपे संपूर्ण । तैसें भोगांतून । निघोनियां ॥१९६॥
हळू हळू चित्त । रिघेल माझ्यांत । तरी तूं [६] निभ्रांत । मी चि होसी ॥१९७॥
ह्यासी च अभ्यास–। योग ऐसें नांव । येणें योगें सर्व । साध्य होय ॥१९८॥

---

१ वतनदार. २ अथवा. ३ गोडी वाटणार नाहीं. ४ पावसाळा. ५ दर दिवशीं. ६ निःसंशय.

अभ्यासाचें बळ । मेळवोनि कोणी । अंतराळांतूनि । संचरती ।।१९९।।
व्याघ्रसर्पादिक । दुष्ट प्राणी कोणी । स्वाधीन करोनि । घेती येणें ।।२००।।
पायवाटे जाती । सागरावरोनि । पचविती कोणी । विष तें हि ।।२०१।।
कोणी शब्द-ब्रह्म । अभ्यासाच्या बळें । सर्वथा आणिलें । आटोक्यांत ।।२०२।।
अभ्यासाच्या बळें । मिळे ना जें साच । ऐसें तों नाहीं च । कांहीं एक ।।२०३।।
म्हणोनि तूं माझ्या । स्वरूपाच्या ठायीं । मिळोनियां जाईं । अभ्यासानें ।।२०४।।

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ।।१०।।

अभ्यास हि ऐसा । करावयालागीं । जरी तुझ्या अंगीं । नाहीं बळ ।।२०५।।
तरी तुझा जैसा । नित्य व्यवहार । असूं दे साचार । तैसा चि तो ।।२०६।।
नको इंद्रियांचें । करूं [1] निरोधन । विषय-सेवन । नको तोडूं ।।२०७।।
आपुल्या जातीचा । अभिमान तो हि । सोडावया कांहीं । नको येथ ।।२०८।।
विधि-निषेधाचें । करावें पालन । कुळ-धर्म पूर्ण । आचरावे ।।२०९।।
सर्व व्यवहार । करावया ऐसे । तुज दिधलीसे । मोकळीक ।।२१०।।
परी पार्था पाहें । मनें वाचा देहें । जैसा होत आहे । [2] व्यापार जो ।।२११।।
तयाचा मी कर्ता । ऐसा अहंकार । अंतरीं साचार । नको ठेवूं ।।२१२।।
करणें आणिक । न करणें तें हि । जाणे सर्व कांहीं । जगन्नाथ ।।२१३।।
जो का परमात्मा । [3] जगत्सूत्रधार । विश्वाचे व्यापार । चालवितो ।।२१४।।
उणें पुरें कैसें । असो तुझें कर्म । ठेवीं मनोधर्म । सारिखा चि ।।२१५।।
नको मानूं त्याचा । चित्तीं हर्ष-शोक । जीवन– [4] सार्थक । एक साधीं ।।२१६।।
माळियानें जळ । जया ठायीं नेलें । तया ठायीं गेलें । [5] निवांत तें ।।२१७।।
तैसे तुझे व्हावे । सर्व हि व्यापार । जाणोनि ईश्वर । सूत्र-धारी ।।२१८।।
असो आडवाट । किंवा उजू मार्ग । रथासी का सांग । चिंता त्याची ।।२१९।।
म्हणोनि प्रवृत्ति–। निवृत्तीचा भार । नको माथ्यावर । बुद्धीचिया ।।२२०।।
नित्य निरंतर । तुझी चित्त-वृत्ति । राहूं दे किरीटी । माझ्या ठायीं ।।२२१।।

---

*परिशिष्ट पहा. १ अडवून ठेवणें. २ व्यवहार; कर्म. ३ जगाचा चालक. ४ कृतार्थता ५ निमूटपणें.

घडे तें तें कर्म । थोडें किंवा फार । नको हा विचार । मनीं आणूं ।।२२२।।
निवांत तें सर्व । मज समर्पून । ठेवीं [१] अनुसंधान । माझ्या रूपीं ।।२२३।।
मग सर्वभावें । ऐसी होतां भक्ति । सायुज्याची प्राप्ति । अंतकालीं ।।२२४।।

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ।।११।।

सर्व कर्में मज । करावीं अर्पण । वाटलें कठिण । हें हि तुज ।।२२५।।
तरी बहु सोपें । आणिक हि एक । सांगेन तें ऐक । पंडु-सुता ।।२२६।।
मनोबुद्धीचिया । ऐसें पाठींपोटीं । किंवा आदि अंतीं । कर्मांचिया ।।२२७।।
मज गुंतवावें । घडे ना हें जरी । राहूं दे तें तरी । असे तैसें ।।२२८।।
राहूं दे बाजूस । पार्था माझें प्रेम । परी एक नेम । धरीं ऐसा ।।२२९।।
सर्व हि कर्मांचा । करीं फल-त्याग । उपाय हा चांग । सांगितला ।।२३०।।
वृक्ष किंवा वेली । टाकिती लोटून । आपुला संपूर्ण । फळ-भार ।।२३१।।
तैसीं झालीं कर्में । त्यजावीं समस्त । [२] गोवूं नये चित्त । फलाशेंत ।।२३२।।
घडे तें तें कर्म । मातें आठवून । करावें अर्पण । हें हि नको ।।२३३।।
नको देऊं मज । नको घेऊं तूं हि । सर्व जाऊं देईं । शून्यामाजीं ! ।।२३४।।
खडकीं वर्षाव । पर्जन्याचा झाला । जैसा वृथा गेला । धनंजया ।।२३५।।
किंवा अग्निमाजीं । पेरिलें जें बीज । जाय तें सहज । जळोनियां ।।२३६।।
ना तरी देखावें । निद्रेमाजीं स्वप्न । तैसें वृथा मान । कर्मजात ।।२३७।।
जैसा [३] अभिलाष । आपुल्या कन्येचा । धरी च ना साचा । जन्म-दाता ।।२३८।।
तैसा चि सकळ । कर्मांचिया ठायीं । निष्काम तूं होईं । धनुर्धरा ।।२३९।।
जैसी अग्नि-ज्वाळा । नभीं वायां जाई । क्रिया जिरूं देईं । तैसी शून्यीं ।।२४०।।
वाटे बहु सोपा । कर्म-फल-त्याग । परी योगीं योग । हा चि थोर ।।२४१।।
जैसीं [४] वेळू-झाडें । विती एक वेळ । मागुतीं केवळ । वांझ होती ।।२४२।।
तैसें फल-त्यागें । कर्म सांडतां च । मागुतें तें साच । अंकुरे ना ।।२४३।।
ह्या चि देहीं होय । [५] विदेहत्व-प्राप्ति । नको च मागुतीं । जन्म घेणें ।।२४४।।

---

*परिशिष्ट पहा. १ लक्ष. २ अडकवूं नये. ३ पापमूलक वासना. ४ बांबू; कळक. ५ जीवन्मुक्ति.

जन्म-मरणाची । संपे येरझार । काय सांगूं फार । धनंजया ॥२४५॥
अभ्यासाच्या योगें । होय ज्ञान-प्राप्ति । ज्ञानें घ्यावी भेटी । ध्यानाची गा ॥२४६॥
मग जिये वेळीं । ध्यानासी च मिठी । देवोनि राहती । सर्व भाव ॥२४७॥
तिये वेळीं सारें । कर्मजात दूर । राहतें साचार । आपोआप ॥२४८॥
दुरावतां कर्म । होतो फल-त्याग । पूर्ण शान्ति-भोग । फल-त्यागें ॥२४९॥
म्हणोनियां शांति । लाभावया साच । क्रम देखें हाच । पंडु-सुता ॥२५०॥
ह्या परी अभ्यास । करावा [1] प्रस्तुत । हें चि तुज [2] उक्त । सर्वथैव ॥२५१॥

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥१२॥

अभ्यासापरीस । ज्ञान हें गहन । ज्ञानाहून ध्यान । असे थोर ॥२५२॥
ध्यानाहून चांग । कर्म-फल-त्याग । त्यागाहून भोग । स्वानंदाचा ॥२५३॥
अनुक्रमें ऐसा । क्रमोनि हा पंथ । शांति-सदनांत । पातला जो ॥२५४॥

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥१३॥

धनंजया पाहीं । [3] चैतन्याच्या ठायीं । आपपर नाहीं । भाव जैसा ॥२५५॥
तैसा कोणाचा हि । स्वभावें साचार । करी ना मत्सर । कदा काळीं ॥२५६॥
उत्तमासी घ्यावें । [4] हीना अव्हेरावें । हें तों नाहीं ठावें । [5] धरित्रीसी ॥२५७॥
किंवा रंकालागीं । लोटोनियां दूर । रायाचें शरीर । चाळवावें ॥२५८॥
ऐसें म्हणे काय । कृपावंत प्राण । सर्व हि समान । तयालागीं ॥२५९॥
व्याघ्रालागीं विष । होवोनियां मारूं । आणि तृषा हरूं । गायत्रीची ॥२६०॥
ऐसा भेदभाव । करूं नेणे पाणी । तया सर्व प्राणी । सारिखे च ॥२६१॥
स्वकीयां प्रकाश । दुज्यांसी अंधार । नेणे हा प्रकार । दीप जैसा ॥२६२॥
तैसी एकपणें । सर्व भूतमात्रीं । असे जया मैत्री । सर्वकाळ ॥२६३॥
म्हणे ना जो मी मी । माझें माझें ऐसें । कृपेसी झालासे । जन्मभूमि ॥२६४॥
आणि क्षमाशील । पृथ्वीसारिखा च । जाणे ना कांहीं च । सुख-दुःख ॥२६५॥

---

१ आतां. २ योग्य. ३ प्राणाच्या ठिकाणीं. ४ अधमाला. ५ पृथ्वीला.



D:\Dyaneshwari_2007\ADA12_342-360 ....353

जेणें संतोषासी । रहावया घर । दिलें मांडीवर । आपुलिया ॥२६६॥

संतुष्ट: सततं योगी यतात्मा दृढनिश्चय: ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्त: स मे प्रिय: ॥१४॥

जैसा [१] महार्णव । वर्षाकाळावीण । जळें परिपूर्ण । असे नित्य ॥२६७॥
तैसा स्वभावें जो । आत्मसंतोषांत । गढोनि रहात । सर्वकाळ ॥२६८॥
सर्वकाळ चित्त । धरी आवरोन । वाहोनियां [२] आण । आपुली जो ॥२६९॥
जयाचिया योगें । निश्चयालागोन । आलें साचपण । धनंजया ॥२७०॥
जीव-परमात्मा । दोन्ही एके ठायीं । शोभती हृदयीं । जयाचिया ॥२७१॥
ऐसा नित्य योग–। संपन्न होऊन । अर्पी बुद्धि मन । माझ्या ठायीं ॥२७२॥
आणि अंतर्बाह्य । योगामाजीं भला । परिपूर्ण झाला । पारंगत ॥२७३॥
परी जया माझें । सगुण साकार । रूपडें साचार । आवडे गा ॥२७४॥
अर्जुना तो भक्त । तो चि योगी मुक्त । तो प्रिया मी कांत । ऐसी ओढ ! ॥२७५॥
नव्हे एवढें च । भक्त माझा प्राण । अपुरी च जाण । उपमा ही ॥२७६॥
परी प्रेमळांचें । करितां वर्णन । जातसें भुलोन । एकाएकीं ॥२७७॥
बोलविते मज । तुझी श्रद्धा पार्था । बोलोनि दावितां । येई ना जें ॥२७८॥
म्हणोनि ओघासी । उपमा जी आली । ती च येथें दिली । प्रेमासी ह्या ॥२७९॥
एऱ्हवीं हें प्रेम । निरुपम जाण । दावावें बोलोन । ऐसें नव्हे ॥२८०॥
असो हें किरीटी । दुणावते प्रीति । [३] संवादितां गोष्टी । प्रेमळाच्या ॥२८१॥
त्यांतून हि श्रोता । भेटतां प्रेमळ । मग [४] तोलवेल । गोडी का ती ? ॥२८२॥
आधीं च तूं पार्था । भक्त आवडता । आणि तूं चि श्रोता । लाभलासी ॥२८३॥
त्या हि वरी गोष्ट । प्रसंगें जी आली । ती हि गोड भली । भक्ताचीच ॥२८४॥
सुखाचा हा योग । भला आला येथें । तरी बोलतों तें । ऐक आतां ॥२८५॥
बोलतां बोलतां । डोलूं लागे देव । दिव्य प्रेम-भाव । सांवरे ना ॥२८६॥
मग म्हणे तया । भक्ताचें लक्षण । घेईं समजोन । धनंजया ॥२८७॥
जया भक्तालागीं । बैसावया जाण । घालितों आसन । हृदयाचें ॥२८८॥

---

१ महासागर. २ शपथ. ३ सांगतांना; बोलतांना. ४ मापतां येईल.

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥१५॥

जळचरां काय । वाटतसे भय । जरी क्षुब्ध होय । महार्णव ॥२८९॥
आणि सिंधु तो हि । न मानितां त्रास । घेतसे तयांस । सामावोनि ॥२९०॥
तैसें पाहोनि हें । जग मदोन्मत्त । वाटे चि ना खंत । जयालागीं ॥२९१॥
आणि जगासी हि । जयाच्यापासोन । होत नाहीं शीण । लेशमात्र ॥२९२॥
काय सांगू फार । जैसें अवयवां । शरीर पांडवा । कंटाळे ना ॥२९३॥
तैसें भूतजात । आपुलें मानीत । नाहीं कंटाळत । कोणासी जो ॥२९४॥
विश्वरूप [१] काया । जाहली म्हणोनि । [२] प्रियाप्रिय दोन्ही । हारपलीं ॥२९५॥
नुरे द्वैतभाव । जयाचिया ठायीं । म्हणोनियां नाहीं । राग-लोभ ॥२९६॥
नाहीं जया भय । नाहीं जया खेद । ऐशा परी द्वन्द्व–। रहित जो ॥२९७॥
त्या हि वरी माझा । एकनिष्ठ भक्त । तरी तो अत्यंत । आवडे गा ॥२९८॥
कोठवरी सांगूं । प्रेम तें वर्णून । भक्त जीव-प्राण । जाण माझा ॥२९९॥
नित्य निरंतर । निजानंदें तृप्त । जो का मूर्तिमंत । परब्रह्म ॥३००॥
[३] पूर्णावस्थारूप । [३] वल्लभेचा [३] कान्त । होवोनि निभ्रांत । राहिला जो ॥३०१॥

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१६॥

जयाच्या अस्तित्वें । सुखाचा उत्कर्ष । जया नाहीं [४] पाश । कामनेचा ॥३०२॥
*वाराणशी मोक्ष । देई निःसंदेह । परी तेथें देह । द्यावा लागे ॥३०३॥
दोषांतें गिळोन । टाकी हिमालय । परी तेथें भय । जीवितासी ॥३०४॥
तैसें न्यून नाहीं । संतांचिये ठायीं । शुचित्व तें पाहीं । आगळें च ॥३०५॥
शुद्ध गंगोदकें । पाप ताप जाय । परी तेथें भय । बुडायाचें ॥३०६॥
तैसा नव्हे भक्त । अर्जुना साचार । अपार गंभीर । असोनी हि ॥३०७॥
न बुडतां तेथें । न येतां मरण । लाभतें [५] निर्वाण । रोकडें च ॥३०८॥
संतांचिया स्पर्शें । गंगेचेहि दोष । सर्वथा [६] निःशेष । हारपती ॥३०९॥

---

१ शरीर. २ आवडतें-नावडतें. ३ पूर्णत्व मिळवलेला. ४ बंधन. ५ मोक्ष. ६ पूर्णपणे.

धनंजया तया । संत-संगतीचें । [1] शुचित्व तें वाचे । किती वानूं ? ॥३१०॥
असो निर्मलत्वें । तीर्थांसी आश्रय । ऐशा परी होय । भक्त जो का ॥३११॥
दाही दिशांपार । आपुले सकळ । जेणें मनो-मळ । घालविले ॥३१२॥
तेजें परिपूर्ण । सूर्य-नारायण । तैसा जो पावन । अंतर्बाह्य ॥३१३॥
दिसे * पायाळूतें । भूमींतील धन । तैसी देखे खूण । तत्त्वाची जो ॥३१४॥
व्यापक [2] उदास । सर्वत्र आकाश । अलिप्त मानस । तैसें ज्याचें ॥३१५॥
व्याधाचिया फांसा–। पासोनि सुटोन । जैसा का उडोन । जावा पक्षी ॥३१६॥
तैसा झाला मुक्त । भव-व्यथेंतून । भूषणें लेवोन । [3] निरिच्छेचीं ॥३१७॥
महा-सुखामाजीं । नित्य परिपूर्ण । निमग्न होवोन । राहिला जो ॥३१८॥
जयालागीं नाहीं । दुःखाची टोंचणी । मृत जैसा कोणी । नेणे लाज ॥३१९॥
आणि अहंकार । नाहीं जया अंगीं । कर्मारंभालागीं । धनुर्धरा ॥३२०॥
जागच्याजागीं च । सर्पणावांचोन । जातसे विझोन । अग्नि जैसा ॥३२१॥
तैसी नित्य-शांति । जयाच्या वाट्यांस । स्वभावें मुक्तास । लाभते जी ॥३२२॥
ऐसा सोऽहं भावें । जो का परिपूर्ण । गेला उल्लंघून । द्वैतालागीं ॥३२३॥
तरी भक्ति-सुख । भोगावें म्हणोन । दो भागीं वांटोन । आपणातें ॥३२४॥
धरोनि अंतरीं । स्वयें सेवा-भाव । मानोनि मी देव । [4] दुज्या भागा ॥३२५॥
न भजती तयां । आचरोनि दावी । भक्तीची बरवी । रीत जगीं ॥३२६॥
ऐसा योग-युक्त । भक्त जो का पूर्ण । तयाचें [5] व्यसन । आम्हांलागीं ॥२२७॥
भेटे तैं च वाटे । आम्हां समाधान । असे निजध्यान । आमुचें तो ॥३२८॥
तयासाठीं आम्हां । सगुण साकार । घडे अवतार । घेणें येथें ॥३२९॥
तयाच्या वरून । प्रेम-भरें जाण । वाटे पंच-प्राण । ओंवाळावे ॥३३०॥

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥१७॥

आत्मलाभाऐसें । [6] गोमटें आणिक । पार्था कांहीं एक । देखेना जो ॥३३१॥
म्हणोनियां भोग । लाधला विशेष । तरी नाहीं हर्ष । जयालागीं ॥३३२॥

---

१ पवित्रपणा. २ अलिप्त. ३ निरिच्छपणाचीं. ४ दुसऱ्या. ५ चटक; आवड. ६ चांगलें.

आपण चि विश्व । होतां स्वयमेव । गेला भेद-भाव । अनायासें ॥३३३॥
म्हणोनिया जया । पुरुषाच्या ठायीं । लेशमात्र नाहीं । द्वेष-भाव ॥३३४॥
चिदानंद रूप । आपुलें जें साच । नाहीं तया वेंच । कल्पांतीं हि ॥३३५॥
जाणोनि हें जग । [1]नश्वर मायिक । गेलें त्याचा शोक । करी ना जो ॥३३६॥
जया पलीकडे । नाहीं च आणिक । ऐसें जें का एक । परब्रह्म ॥३३७॥
तें तो स्वयें होय । आपुल्या चि ठायीं । म्हणोनि जो कांहीं । आकांक्षी ना ॥३३८॥
नोळखे जो कांहीं । बरें कीं वाईट । नेणे दिन-रात । सूर्य जैसा ॥३३९॥
ऐसा जो अखंड । ज्ञानरूप झाला । त्या हि वरि भला । भक्त माझा ॥३४०॥
तरी तयाऐसें । प्रेमळ सोयरें । नाहीं च दुसरें । तुझी आण ॥३४१॥

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥१८॥

तेविं धनंजया । जयाचिया ठायीं । जाणीव हि नाहीं । [2]वैषम्याची ॥३४२॥
करो कोणी मैत्री । करो वा शत्रुत्व । दोहोंसी महत्त्व । सारिखें चि ॥३४३॥
लावित्यासी किंवा । तोडूं पाहे तया । एक चि दे छाया । वृक्ष जैसा ॥३४४॥
किंवा गाळित्यासी । कडू [3]इक्षु-दंड । पाळित्यासी गोड । ऐसें नाहीं ॥३४५॥
तैसे शत्रु-मित्र । जयातें समान । मान-अपमान । सारिखेच ॥३४६॥
तीन हि ऋतूंत । सारिखें च [4]व्योम । तैसा राहे सम । शीतोष्णीं जो ॥३४७॥
उत्तर-दक्षिण–। वारे जोरदार । तयांमध्यें स्थिर । * मेरु जैसा ॥३४८॥
तैसा सुख-दुःखें । प्राप्त होतां येथ । राहे जो मध्यस्थ । उदासीन ॥३४९॥
असो हीन रंक । असो राजा थोर । चांदिणें मधुर । सर्वांसी च ॥३५०॥
तैसें म्हणे ना जो । उत्तम अधम । सर्वां भूतीं सम–। भाव ज्याचा ॥३५१॥
इच्छिती जयातें । पार्था तिन्ही लोक । सर्वां [5]सेव्य एक । तोय जैसें ॥३५२॥
सर्व हि संबंध । सोडोनियां चांग । होवोनि [6]निःसंग । अंतर्बाह्य ॥३५३॥
अखंड आपण । आपुल्या ठायीं च । राहे एकला च । स्वभावें जो ॥३५४॥

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् ।

---

१ नाशिवंत. २ भेदाची. ३ ऊंस. ४ आकाश. ५ सेवन करण्यास योग्य. ६ अलिप्त.

अनिकेत: स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नर: ॥१९॥

होतां निंदा स्तुति । [१]डंडळेना चित्त । असे जो अलिप्त । नभाऐसा ॥३५५॥
निंदा स्तुति दोन्ही । समान लेखोनि । हिंडे जनीं वनीं । प्राणाऐसा ॥३५६॥
लटिकें वा साच । न बोले कांहींच । मोडलें नाहीं च । मौन ज्याचें ॥३५७॥
पुरें म्हणे ना जो । घेतां उपभोग । नित्य नवा [२]चांग । *उन्मनीचा ॥३५८॥
सांगें धनंजया । पर्जन्यावांचोन । समुद्र आटोन । जाई काय ? ॥३५९॥
तैसा लाभालाभीं । नाहीं हर्ष-खेद । मिळे तें तें गोड । वाटे जया ॥३६०॥
करी वायु जैसा । सर्वत्र संचार । न राहतां स्थिर । एके ठायीं ॥३६१॥
तैसा विश्वामाजीं । धरी ना कोठें च । एके ठायीं [३]साच । आश्रय जो ॥३६२॥
विश्व हें चि तया । विश्रांतीचें स्थान । वायूसी गगन । असे जैसें ॥३६३॥
आघवें हें विश्व । आपुलें चि घर । ऐसी [४]मति स्थिर । जयाची गा ॥३६४॥
धनंजया तुज । काय सांगूं फार । झाला चराचर । आपण चि ॥३६५॥
ह्या हि वरी आस्था । धरोनि जो चित्तीं । करी माझी भक्ति । आवडीनें ॥३६६॥
तया डोकीवरी । घेवोनि मी नाचें । एवढें भक्ताचें । प्रेम मज ॥३६७॥
उत्तमातें नम्र । करावें मस्तक । कायसें कौतुक । असे ह्यांत ॥३६८॥
परी तयाचिया । [५]पादोदकातें हि । भावें मान देई । तिन्ही लोक ॥३६९॥
जी का श्रद्धावस्तु । तियेचा आदर । करावा साचार । कैशा रीती ॥३७०॥
कळावें हें पूर्ण । ऐसी इच्छा जरी । तरी गुरु करीं । शंकरासी ॥३७१॥
परी असो आतां । वानितां *शिवातें । आत्म-स्तुति होते । म्हणोनियां ॥३७२॥
पुरे हें वर्णन । बोले नारायण । शिरीं वाहें जाण । भक्तासी मी ॥३७३॥
कीं जो मोक्षरूप । चौथा *पुरुषार्थ । घेवोनि हातांत । आपुलिया ॥३७४॥
पार्था भक्ति-पंथें । मग तो चि येथ । निघाला वांटीत । लोकांलागीं ॥३७५॥
ब्रह्म-कैवल्याचा । तो चि अधिकारी । सोडबांध करी । मोक्षाची तो ॥३७६॥
परी जळाऐसें । धरी नम्रपण । म्हणोनि वंदन । करूं तया ॥३७७॥
तयालागीं आम्ही । शिरीं वाहूं साच । *वक्षस्थलीं टांच । धरूं त्याची ॥३७८॥

---

*परिशिष्ट पहा. १ डळमळत नाहीं. २ चांगला. ३ खरोखर. ४ बुद्धि. ५ पायाच्या तीर्थाला.

आणि वाचे त्याचें । करूं गुण-गान । कीर्तीचें भूषण । लेवूं कानीं ॥३७९॥
मज * अचक्षूचे । धांवती लोचन । तयाचें वदन । पहावया ॥३८०॥
मज हातींचिया । लीला-पद्में जाण । करितों पूजन । तयाचें मी ॥३८१॥
रूप चतुर्भुज । घेतलें सगुण । तया आलिंगन । द्यावयासी ॥३८२॥
मिळावें तयाच्या । संगतीचें सुख । म्हणोनियां देख । धनंजया ॥३८३॥
मज [1] विदेहातें । घ्यावा लागे देह । ऐसा निःसंदेह । आवडे तो ॥३८४॥
आवडे तो भक्त । आम्हांसी अत्यंत । नवल तें येथ । काय असे ॥३८५॥
परी जे भक्ताचें । ऐकती चरित्र । वर्णिती पवित्र । कीर्ति त्याची ॥३८६॥
ते हि आवडती । मज प्राणाहून । सुनिश्चयें जाण । पंडु-सुता ॥३८७॥
जो हा योगरूप । भक्ति-योग येथ । संपूर्ण साद्यंत । सांगितला ॥३८८॥
जेणें भक्तालागीं । मस्तकीं धरोन । प्रेमें करीं ध्यान । तयाचें मी ॥३८९॥
जिये भक्ति-योग–। स्थितीचें महत्त्व । एवढें [2] अपूर्व । होय पार्था ॥३९०॥

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥२०॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम
द्वादशोऽध्यायः ॥१२॥

ती ही धर्म-कथा । असे मनोरम । गोड धारेसम । अमृताच्या ॥३९१॥
ऐकोनि ही कानीं । जाणती जे कोणी । [3] प्रचीत घेवोनि । अंतर्यामीं ॥३९२॥
तेविं श्रद्धेचिया । आदरें हा योग । विस्तारला चांग । ज्याच्या ठायीं ॥३९३॥
चोखाळल्या क्षेत्रीं । पेरिलें जें बीज । अंकुरे सहज । जैसें पार्था ॥३९४॥
तैसी माझी भक्ति । सांगितल्या [4] रीती । [5] विरूढली चित्तीं । जयाचिया॥३९५॥
तो चि भक्त जगीं । तो चि योगी मोठा । अखंड उत्कंठा । त्याची मज ॥३९६॥
तो चि पुण्य-भूमि । तो चि पुण्य-राशि । आवडे जयासी । भक्ति-कथा ॥३९७॥
मानूं तया आम्ही । आपुलें दैवत । करूं अखंडित । ध्यान त्याचें ॥३९८॥

---

१ देहरहित असलेल्याला. २ विलक्षण. ३ अनुभव. ४ रीतीनें. ५ चांगली रुजली.

बरवें आणिक । नाहीं तयाविण । तयाचें व्यसन । आम्हालागीं ।।३९९।।
सर्वस्व निधान । आमुचें तो जाण । वाटे समाधान । भेटीमाजीं ।।४००।।
भक्तांची जे कोणी । प्रेमें गाती कथा । परम देवता । आमुची ते ।।४०१।।
ऐसें सांगितलें । तेणें नारायणें । संजय तो म्हणे । ऐकें राजा ।।४०२।।
प्रभु कृष्णदेव । भक्तांचा आनंद । होय मूल-कंद । [१] विश्वाचा जो ।।४०३।।
एकनिष्ठभावें । शरण जे आले । तयांलागीं भलें । सांभाळी जो ।।४०४।।
जया एकातें चि । रिघावें शरण । ऐसा दया-घन । संपूर्ण जो ।।४०५।।
लोकांचें [२] लालन । ही च ज्याची लीला । निष्कलंक भला । निर्मळ जो ।।४०६।।
भक्तांचा सांभाळ । हें ज्याचें कौतुक । [३] सुर-साहाय्यक । स्वभावें जो ।।४०७।।
ज्याची धर्म-कीर्ति । अखंड उज्ज्वल । अगाध सरळ । दातृत्वें जो ।।४०८।।
अतुल सामर्थ्यें । सर्वथा प्रबळ । परी द्वारपाळ । बळीचा जो ।।४०९।।
निज-भक्तांवरी । करी बहु लोभ । स्वभावें सुलभ । प्रेमळां जो ।।४१०।।
जो का [४] सत्य-सेतु । कला-निधिपूर्ण । जो का भक्तजन–। चक्रवर्ती ।।४११।।
तो चि वक्ता येथ । वैकुंठींचा नाथ । आणि श्रोता पार्थ । भाग्यवंत ।।४१२।।
संजय तो म्हणे । आतां श्रीगोपाळ । कैसें निरूपील । ऐकें राजा ।।४१३।।
रसाळ ती कथा । बोलूं मराठींत । ऐका श्रोते चित्त । देवोनियां ।।४१४।।
तुम्हां साधुसंतां । जावोनि शरण । सेवावे चरण । भक्ति-भावें ।।४१५।।
ज्ञानदेव म्हणे । सद्गुरु निवृत्ति । हें चि शिकविती । आम्हांलागीं ।।४१६।।

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी

द्वादशोऽध्याय: ।

हरये नम: । हरये नम: । हरये नम: ।

।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

---

१ विश्वाचें बीज. २ पालनपोषण. ३ देवांचा साह्यकर्ता. ४ सत्यानें वागणाऱ्यांचा तारक.